# लोक महाविद्यालय, वर्धा

# प्रश्न पेढी

## विषय : मराठी

# बी. ए. प्रथम वर्ष

# प्रथम सत्र

# दिर्घोत्तरी प्रश्न

**गद्य:**

१) तुम्ही शिकलेल्या लीळेच्या आधारे यादवकालीन भाषेचे सौदंर्य स्पष्ट करा ?

२) तुम्ही शिकलेल्या लीळेच्या आधारे लीळाचरित्राचे विशेष स्पष्ट करा ?

३) स्वराज्य रक्षण या पाठात रामचंद्रपंत अमात्य यांनी राजाराम महाराजांच्या पराक्रमाचे वर्णन कसे केले आहे ?

४) महात्मा फुले यांनी भारतीय शेतीच्या स्थितीगतीचे वर्णन कसे केले आहे ?

५) संस्कृतीची संकल्पना साने गुरुजींच्या संस्कृती व साहित्य या पाठाच्या आधारे स्पष्ट करा ?

६) 'संस्कृती आणि साहित्य' या लेखातून साने गुरुजी यांनी संस्कृती आणि साहित्याचा संबंध कसा स्पष्ट केला आहे ?

७) 'संस्कृती व साहित्य' या लेखातून साने गुरुजी यांनी साहित्येकांना कोणता उपदेश केला आहे?

८) लक्ष्मीबाईंच्या सासुरवासाचे तुमच्या शब्दांत वर्णन करा ?

**पद्य :**

९) संत ज्ञानदेवांच्या हरिपाठाच्या अभंगांचे रसग्रहण करा ?

१०) नलराजाच्या हातून सुटण्यासाठी हंसाने नल राजाशी कसा संवाद साधला आहे ?

११) 'हंस-नल संवाद' या कवितेचे रसग्रहण करा ?

१२) 'घन:श्याम सुदंरा' या भूपाळीचे रसग्रहण करा ?

१३) केशवसुतांच्या 'स्फूर्ती' या कवितेतील सामाजिक आशय स्पष्ट करा ?

१४) केशवसुतांच्या 'स्फूर्ती' या कवितेचे रसग्रहण करा ?

१५) 'खेड्यातील रात्र' या बालकवींच्या कवितेचे रसग्रहण करा ?

**लघुत्तरी प्रश्न :**

१) लोक आपापसात का कुजबुजू लागले व त्यांना ब्राम्हणाने काय उत्तर दिले ?

२) सत्य शोधण्यास गेलेल्या ब्राम्हणाला कोणते दृश्य दिसले व त्याचा त्या ब्राम्हणावर काय परिणाम झाला ?

३) रोज ठराविक प्रश्न विचारणाऱ्या ब्राम्हणाला पाहून दुसऱ्या ब्राम्हणाला नवल का वाटते ?

४) राजाराम महाराजांनी राज्याचा बंदोबस्त कसा केला ?

५) सिंद्दीचा बंदोबस्त करण्यात शिवाजीराजांना अपयश का आले ?

६) पाठाच्या शेवटी रामचंद्रपंत अमात्य यांनी राजकुमाराला उद्देशून कोणते मार्गदर्शन केले आहे ?

७) पाण्याच्या सोयीसंबंधी फुलेंचे विचार सांगा ?

८) शेती सुपीक करण्यास फुले शेवळया-मेंढयासंबंधी कोणता उपाय सुचवितात ?

९) शेतकऱ्यांच्या  मुलांचा शेतासाठी कसा उपयोग करता येईल ?

१०) शेती सुपीक करण्याचा उपाय कोणता ?

११) संस्कृतीविषयी रवीद्रंनाथांनी काय म्हटले आहे ?

१२) संस्कृती म्हणजे काय ?

१३) साहित्याचा कलेचा तसा फारसा अभ्यास मी केलेला नाही असे साने गुरुजी का म्हणतात ?

१४) ‘तुमची सहानुभूती ज्या मानाने व्यापक त्या मानाने तुम्ही मोठे साहित्यिक व्हाल’ असे साने गुरुजी का म्हणतात ?

१५) साने गुरुजी यांनी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद का नाकारले ?

१६) लक्ष्मीबाईचे सासरे यांचा आणि त्यांच्या पतीचा जिवंतपणी बारावा, तेरावा का घालत होते ?

१७) टिळक लक्ष्मीबाईना कशी मदत करत ?

१८) छळ करणाऱ्या सासऱ्यांचे कोणते दोन गुण लक्ष्मीबाईना आवडत असत ?

१९) तेल, शिकेकाईच्या नेहमीच्या खटक्यात कोणती गोष्ट लक्ष्मीबाईंचे सासरे त्यांना सांगत ?

२०) लक्ष्मीबाईंच्या सासऱ्यांनी गोविंदराव मामांना पाठविलेल्या पत्रात काय लिहिले होत ?

**पद्य :**

२१) ‘देवाचिये द्वारी उभा क्षणभरी /तेणे मुक्ती चारी साधियेल्या’ असे ज्ञानदेव का म्हणतात ?

२२) ‘तीर्थ व्रत नेम, भावेविण सिद्धी /वायाचि उपाधि करिसी जना’ असे ज्ञानेश्वर का म्हणतात ?

२३) ज्ञानदेवांच्या मते नामस्मरण कसे करावे ?

२४) ‘पांखिरुन’ हे मारणे बुद्धि खोटी असे हंस नलराजाला का म्हणतो ?

२५) हंसाने आपल्या मातेविषयी आणि पत्नीविषयी नलराजाला काय सांगितले ?

२६) हंसाने शेवटी राजाची स्तुती कशी केली आहे ?

२७) होनाजी बाळांनी श्रीकृष्णाला कोणकोणत्या नावांनी प्रस्तुत भूपाळीत संबोधले आहे ?

२८) रुढींचे दास केव्हा खवळून उठतील असे केशवसुतांना वाटते ?

२९) देवदानवा जरे निर्मिले असे केशवसुत का म्हणतात ?

३०) केशवसुतांनी कवित्व शक्तीचे महात्म्य कसे वर्णन केले आहे ?

३१) उजाड माळाचे वर्णन बालकवींनी कसे केले आहे ?

३२) हुंकार देणाऱ्या रात्रीचे वर्णन बालकवींनी कसे केले आहे ?

३३) ‘अवकळा रात्रीचा प्रहर घुमे तो थोर’ असे बालकवी का म्हणतात ?

**व्यावहारिक मराठी :**

३४) व्यावाहारिक अभ्यासक्रमाची गरज का आहे ? ते थोडक्यात स्पष्ट करा ?

३५) नियतकालिकात लेखन करण्यासाठी कोणकोणत्या तंत्रांची माहिती असणे आवश्यक असते ?

३६) भाषांतर या मराठीच्या व्यवहारक्षेत्राचे महत्व सांगा ?

३७) सारांश लेखन म्हणजे काय, ते सांगून सारांश लेखनाची आवश्यकता का भासते ?

३८) दैनंदिन जीवनातील पत्रलेखनाचे महत्व सांगा ?

३९) जाहिरात लेखनाचे महत्व सांगा ?

४०) संपाद म्हणजे काय ?

४१) भाषिक संवाद व्यवहार म्हणजे काय ?

४२) हेतुमूलकता म्हणजे काय ?

४३) भाषिक संवादव्यवहारातील पुनरावृत्तीचे महत्व सांगा ?

४४) 'परस्परातील भेद व पर्यायाचे तत्व' या भाषिक संवादव्यवहाराच्या मूलतत्वाची माहिती सांगा ?

४५) चेतन व अडथळे यांची सापेक्षता स्पष्ट करा ?

४६) 'तडजोड' या भाषिक संवादव्यवहाराच्या मूलतत्वाची आवश्यकता सांगा ?

*****************

***********

# बी. ए. प्रथम वर्ष

# द्वितीय सत्र

# दिर्घोत्तरी प्रश्न

**गद्य :**

१) ‘पूर्णिया’ या पाठातून स्त्रियांच्या सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीचे वर्णन लेखक अनिल अवचट यांनी कसे केले आहे ?

२) ‘इरावतीबाईचे विठ्ठलाशी अजब नाते होते’ असे पु.ल.देशपांडे का म्हणतात ?

३) ‘मुक्त पक्षी’ या कवितेतून कवी माधव जूलियन यांनी विरहाचे दु:ख कसे वर्णन केले आहे ?

४) लोकशाहीयुक्त समाजवादाचे आणि सर्वधर्मसमभावाचे भावपूर्ण चित्रण राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी कसे केले आहे ?

५) इरावतीबाई कर्व्यांचे व्यक्तीचित्रण तुमच्या शब्दात करा ?

६) इरावतीबाईंना दीपमाळ असे का म्हटले आहे ? इरावतीबाईचे ज्ञान, लेखन आणि संशोधन याबद्दल लेखकाने कोणते मत व्यक्त केले आहे ?

७) मला इरावतीबाईकडे एकव्यानेच जावे लागते असे पु.ल. का म्हणतात ?

८) इरावतीबाई सगळयांना चकवून गेल्या असे पुलंनी का म्हटले ?

९) मला अनासायाने जाता यावे, ही त्यांची मागणी मृत्यूने इतकी शब्दश: पाळायची काय आवश्यकता होती ? असा प्रश्न पुलंनी का विचारला आहे ?

१०) वामन चोरघडे यांच्या ‘संस्कार’ या कथेतून नायकावर होत जाणाऱ्या संस्काराचे चित्रण कसे केलेले आहे ?

११) ओली माती कुभाराच्या चाकावर आकारीत होताना काय वाटत असेल ?

१२) दगडातून मूर्ती कोरली जात असतांना दगडाला काय वाटत असेल ? या उदाहरणांमधून वामन चोरघडे यांना नेमके काय सुचित करावयाचे आहे?

१३) सलमाचे व्यक्तिदर्शन घडवा ?

१४) ‘संस्कार’ या कथेतील नायकाचे व्यक्तिदर्शन घडवा ?

१५) ‘संस्कार’ या कथेचे आकर्षण वाढविणारे गुणविशेष कोणते ते स्पष्ट करुन सांगा ?

१६) ‘संस्कार’या पाठातील आविष्काराच्या दृष्टीने ही गोष्ट कोणकोणती वैशिष्ट्ये दाखवते ते सांगा?

१७) ‘ग्रेस’ या व्यक्तीचित्रणाआधारे माणिक गोडघाटेचे व्यक्तिचित्रण तुमच्या शब्दात साकार करा ?

१८) ‘माणिकचा बाजारभाव शून्य’ असे म्हणणारे लेखक पुढे माणिक जीवनाशी इतक्या जिद्दीने कधी लढला नसेल असे कां म्हणतात?

१९) ‘जेव्हा मी जात चोरली होती !’ या कथेआधारे लेखक बाबुराव बागूल आणि काशीनाथ, यांचे व्यक्तिचित्रण रेखाटा ?

२०) ‘पूर्णिया’ तील मानवीजावनाचे वर्णन आपल्या शब्दात करा ?

२१) पूर्णिया मधील स्त्रीजीवनाचे आपल्या शब्दात वर्णन करा ?

२२) पूर्णिया पाठात अनिल अवचटांनी तेथील स्त्रीजीवनाचे वर्णन कसे केले आहे ?

२३) ‘परदेशात जाणाऱ्यांनी एकदा बुजबुजलेला भारत पाहून यावा’ असे लेखक का म्हणतात ? ह्याचे चिंतनात्मक विश्लेषण करा ?

२४) ‘पूर्णिया’ पाठावरुन आपल्या मनात काय येते ह्याची चर्चा करा ?

**पद्य :**

१) पिंजऱ्यातील पक्षी पिंजऱ्याच्या मालकाशी कोणता संवाद करतो ?

२) जीवन मरणाबद्दल कवयित्रीने कोणते विचार मांडले आहेत ?

३) जन्ममृत्युबद्दल बहिणाबाईनी कोणते चिंतन व्यक्त केले आहे ?

४) राष्ट्रसंत तुकडोजी यांनी ‘या झोपडीत माझ्या’ या कवितेत कोणती सुखे मिळाल्याचे सांगितले असून त्याद्वारे ते कोणता उपदेश करु पाहतात ? हे तुमच्या शब्दात लिहा.

५) राष्ट्रसंतांच्या झोपडीचे वर्णन करुन कवितेचा प्रतिपाद्य विषय समजावून सांगा ?

६) कवी बा.सी. मर्ढेकर हे ‘भंगु दे काठिन्य माझे’ असे कां म्हणतात ?

७) पुरामुळे विद्यार्थ्यांच्या संसाराची दुर्दशी कशी झाली ते सविस्तर लिहा ?

८) ‘कणा’ या कवितेत विद्यार्थी नायकाच्या स्वभावाची कोणती वैशिष्टये प्रकट झाली आहेत ?

९) ‘कणा’ या कवितेतून जीवनाविषयक दृष्टांत स्पष्ट करा ?

**लघुत्तरी प्रश्न :**

१) इरावतीबाई गेल्याचे कळताच पुलंनी कोणती प्रतिक्रिया व्यक्त केली ?

२) गौरी विसर्जनानंतर देवधरातला तो मोकळा पाट जसा ओकाबोका दिसतो तसे लेखकांना का वाटले ?

३) इरावतीबाईच्या निधनाने पुलंना वाटणारी हळहळ कशी व्यक्त झाली आहे ?

४) इरावतीबाईच्या गुलटेकडीला केलेले नवे घर पहायला लेखक गेले होते त्यावेळचा वृत्तांत कथन करा ?

५) जांभे दगड त्यांचे नाते कोकणातल्या त्याच्या माहेरच्या रक्तांशी नेऊन जोडीत होते. आणि सासरच्या संबंधाने एक दुसऱ्याशी सांधत होते कसे ते सांगा ?

६) इरावतीबाईच्या डोळयांना रोजरोज तेचतेचची बाधा नव्हती हे कशावरुन स्पष्ट होते ?

७) इरावतीबाईचे मूळ आडनाव ‘कडवे’ असावे असे पुलंना का वाटते ?

८) लेखकाने कॉलेजमध्ये असताना प्रिन्सिपॉलजी दहशत का घेतली ?

९) ‘शिस्त’ हा एकच शब्द कर्व्यांच्या कोशात असावा असे पुलंना का वाटते ?

१०) पुलंची इरावतीबाईंच्या पहिल्या भेटीचा वृत्तांत सांगा ?

११) पुलंनी ‘अभिरुची’तून लिहिण्याच्या बाबतीत कोणती भूमिका व्यक्त केली ?

१२) पुलंनी ‘परिपूर्ती’ या इरावतीबाईंच्या कथेवर कोणती प्रतिक्रिया व्यक्त केली आहे ?

१३) ‘परिपूर्ती’ हे पुलंना मराठी साहित्यातले न कोमजणारे फूल का वाटते ?

१४) इरावतीबाईना विठ्ठलाशी अजब नाते होते असे पुलं का म्हणाले ?

१५) इरावतीबाईना विठ्ठलाचे व्यसन होते व विठ्ठल त्यांचा बॉलफ्रेंड होता असे पुलंनी का म्हटले आहे?

१६) इरावतीबाईनी पंढरीच्या वारीचा प्रसाद कसा वाटला ? परकरी पोर होऊन बागडावे असे वाटले की इरावतीबाई काय करीत असे ?

१७) माहेरवाशिणीचा आनंद इरावतीबाईंच्या चेहऱ्यांवर पुलंना केव्हा दिसत होता ?

१८) मानववंशच्या शास्त्रज्ञाच्या इरावतीबाईच्या भूमिकेचे वर्णन पुलंनी कसे केले आहे ?

१९) आपल्या जीवनातले दुर्घट मुशाफरीतले नवनीत समाजापुढे कोणी ठेवले ?

२०) महाराष्ट्राच्या पाच सुकन्या किंवा पंचकन्या असे पुलंनी कोणाला व का गौरविले ?

२१) उरलासुरला पुरुषी अहंकार कापरासारखा केव्हा जळून जाईल असे पुलंना वाटते ?

२२) इरावतीबाईबद्दल वृक्षासारखी नकळत सावली धरणारी असे उद्‌गार पुलंनी केव्हा काढले आहेत?

२३) मानसन्मानातून युक्तीने अलिप्त राहिलेल्या इरावतीबाईंनी पुलंचे अभिनंदन का केले ?

२४) पुलंनी सर्टीफिकेटासारखे कशाचे जतन  केले आहे ?

२५) पुलंनी विद्वान लेखक आणि साहित्यकारांना कोणती सूचना केली ?

२६) पंढारीचा विठ्ठलही

२७) अन्वर पाटील याविषयी थोडक्यात माहिती सांगा ?

२८) आत्मस्तुतीचा क्षण जसा माणसाला सुख देतो तसेच आत्मनिंदेने कधी कधी बरे वाटते, असे लेखकाला

२९) नायकाने भर रस्त्यावर सलमाला रंगेल ललकाऱ्या मारुन ‘हाय रे’ असे कां म्हटले ?

३०) अभद्र बोलण्याबद्दल सलमाने नायकाला प्रथम बोलावले. त्यामुळे नायकाची स्थिती कशी झाली?

३१) नायकाने दिलेल्या शिव्या आपल्याला आवडल्या नाहीत याचे कोणते करण सलमाने दाखविले ?

३२) हुतूतू खेळात नायकाने का भांडण केले ? त्यावेळी सलमा काय म्हणाली ?

३३) ‘संस्कार’ मधील नायिकेचे वर्णन करा ?

३४) लेखक ज्या शाळेत जात असे, त्या शाळेचे वर्णन करा ?

३५) लेखकाची खोडी कोणी काढली ? कां ?

३६) गोडघाटे पॉवरबाज निरोप हिंदीत पाठवितो असे लेखक का म्हणतात ?

३७) गोडघाटेंची कोणती व्यथा-जखम वामनरावांनी उघड केली ?

३८) लेखक ‘मी अवस्थ झालो’ असे का म्हणाल ?

३९) गोडघाठेचा लेखकावर कोणता राग होता असे लेखकास वाटते ?

४०) त्रासा केल्याशिवाय माणिकचे प्रेम व्यक्त होऊ शकत नव्हते असे लेखक का म्हणतात ?

४१) माणिकची आई वारल्यानंतर दुसऱ्या आईने ताबा घेतला होता – विधान स्पष्ट करा ?

४२) माणिकच्या घराचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?

४३) माणसाने मरायला काळवेळ बघावा की नाही असे लेखक का म्हणाले ?

४४) माणिक आणि डबा घेऊन येणाऱ्या लीला यांच्यातील प्रसंगावर भाष्य करा ?

४५) माणिककडे जिव्हाळयाने न जाता परिस्थितीच मात्र खेचत होती असे लेखकाने का म्हटले आहे?

४६) शांतारामांनी लेखकाला कोणती ताकीद दिली ? का ? कोणते प्रकरण गाजले व लेखकावर बरेचसे शेकले असे लेखक म्हणतात ?

४७) दोन दोन दिवस आग्रहाने पाहुणचार करणाऱ्या माणिकने लेखकास त्याच्या घराची दारे बंद कां केली ?

४८) माणिक त्या दिवशी खूप दिवसांनी हाती लागला होता असे लेखलाने का म्हटले आहे ?

४९) लेखकावर जातचोरीची कोणती आपत्ती आली होती ?

५०) अंत:करणाचे अग्निकुंड केव्हा होते असे लेखक म्हणतात ?

५१) लेखकाचे मन प्रफुल्लित झाले असताना ते मेघाप्रमाणे कां गरजले ?

५२) भांडार भरुन असलेला भारत भिकारी कां झाला ?

५३) खोलीत येण्याविषयी रणछोड लाचार होऊन लेखकास का विनवतो ?

५४) महार आणि अस्पृश्य या दोन संकल्पनांवर कथेच्या आधारे भाष्य करा ?

५५) लेखकाची फाशीच्या तक्त्याकडे चाललेल्या कैद्यायसारखी मन:स्थिती केव्हा व कां झाली ?

५६) लेखकाने स्वत:चे वर्णन कसे केले ते सांगून कारण स्पष्ट करा ? लेखकाने जात कशी चोरली ?

५७) लेखकाने मुकादमाकडे जाऊन कोणते क्रांतिकारक विचार व्यक्त केले ? कां ?

५८) माझ्या अस्वस्थतेला अंत राहिला नव्हता असे लेखकाने कां म्हटले आहे ?

५९) कथेचा अंत तुमच्या शब्दांत लिहा ?

६०) एका चोराने जात चोरीची चोरी कशी जाहीर केली ? त्याचे परिणाम सांगा ?

६१) रजौलीच्या मेडिकल सेंटरवर लेखकास काय आढळले ?

६२) स्त्रियांचे बंदिस्त जीवन कुठल्या प्रसंगातून स्पष्ट केले ?

६३) पूर्णिया त शिक्षणाची अवस्था लेखकास कशी आढळली ?

६४) अभ्रकाच्या खाणीत काम करणाऱ्या मजुरांवर कोणते संकटे ओढवते ?

६५) बिहारमध्ये सुधारणेचे आंदोलन यशस्वी का झाले नाही ह्याची कारणमीमांसा द्या ?

**पद्य विभाग :**

१) पिजंऱ्यातील पक्षी स्वातंत्र्य का नाकारतो ?

२) वाऱ्यावर सोडलेस असे का म्हटले आहे ?

३) जन्माची जाग केव्हा येते असे

४) देहाची क्षणभंगुरता कवयित्रीने कशी स्पष्ट केली आहे ?

५) काम करताकरता देवाजीचं रुप पहायला कवयित्रींनी कां सांगितले आहे ?

६) तोलाचं जगणं कसं जगायला बहिणाबाईंनी सांगितले आहे ?

७) संसारात राहून कसे हसता येईल असे कवयित्रीला वाटते ?

८) तुकडोजींनी वर्णन केलेल्या राजाच्या महालाची नोंद तुमच्या शब्दात समजावून सांगा ?

९) महालातील 'सौख्या' पेक्षा झोपडीतील सुख कसे श्रेष्ठ आहे ते स्पष्ट करा ?

१०) द्रौपदीचे सत्व माझ्या लाभु दे भाषा-शरीरा असे कवी का म्हणतात ?

११) कवी स्वत:ला शब्दवाही भिकारी का म्हणतो ?

१२) नायकरुपी विद्यार्थी कवीकडे कोणत्या अवस्थ्नेत आला होता ? कां ?

१३) ''मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा

पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा।''

या काव्यपंक्तीचा अर्थ स्पष्ट करा ?

**व्यावहारिक मराठी :**

१) पत्रलेखन म्हणजे काय ? त्याचे स्वरुप थोडक्यात सांगा ?

२) पत्रव्यवहाराचे प्रमुख प्रकार कोणते ?

३) पत्रलेखनाचे प्रमुख घटक कोणते ? वैशिष्टये कोणती ?

४) साराशलेखन म्हणजे काय ? त्याचे स्परुप कसे असते ?

५) सारांशलेखनाची पद्धती सांगा ?

६) सारांशलेखन करताना कोणती काळजी घेतली पाहिजे ?

७) सारांशलेखन कसे करावे ? यासंबंधीची कोणती सूत्रे सांगता येतील ?

*******************

************

# बी. ए. द्वितीय वर्ष

# तृतीय सत्र

# दिर्घोत्तरी प्रश्न

**गद्य विभाग :**

१) रुंभणेयाचा दृष्टांन्त या पाठाचे रसग्रहण करा ?

२) रुंभणेयाचा दृष्टान्त या पाठातील आशयसौदंर्य उलगडून दयावा ?

३) रुंभणेयाचा दृष्टान्त या पाठातून ग्रंथकाराने केलेल्या उपदेशाचे स्वरुप स्पष्ट करा ?

४) 'स्त्री-पुरुष तुलना' या पाठातील व्यक्त झालेला ताराबाई शिंदे यांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन स्पष्ट करा?

५) 'स्त्री-पुरुष तुलना' या पाठातून ताराबाई शिंदे यांनी स्त्रियांचे महत्व कसे स्पष्ट केले आहे ?

६) 'स्त्री-पुरुष तुलना' या पाठाचे आधारे स्त्री-पुरुष समानतेचे महत्व स्पष्ट करा ?

७) स्त्री-पुरुष तुलना' या पाठातून ताराबाई शिंदे यांनी स्त्री-पुरुष विषमते दर्शन कसे घडवले आहे ?

८) 'मी वक्ता कसा झालो' या पाठाच्या आधारे आचार्य प्र.के.अत्रे यांच्या वक्तृत्वाची जडणघडण स्पष्ट करा?

९) 'मी वक्ता कसा झालो' या पाठातून आचार्य अत्रे यांनी आपल्या वक्तृत्वाचा प्रवास कसा उलगडून दाखविला आहे ते सविस्तर स्पष्ट करा ?

१०) पंडित महादेवशास्त्री जोशी यांनी विटेवरचे परब्रम्ह या पाठात पंढरपूर या क्षेत्राचे वर्णन कसे केले आहे?

११) विटेवरील ब्रम्ह या पाठात पंडित महादेवशास्त्री जोशी यांनी विठ्ठलाचे वर्णन कसे केलेले आहे ?

१२) पंडित महादेवशास्त्री जोशी यांनी चंद्रभागेचे वर्णन कसे केले आहे ?

१३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी शिक्षकांचे मोठेपण कशाप्रकारे व्यक्त केले आहे ?

१४) शिक्षक हाच राष्ट्राचा भाग्यविधाता असे तुकडोजी महाराज का म्हणतात ?

१५) शिक्षक कसा असावा, असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना वाटते ?

१६) आदर्श विद्यार्थी कसा असावा, असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाना वाटते ?

**पद्य विभाग :**

१) संत नामदेवांनी आपल्या अभंगातून विठ्ठलाचे वर्णन कसे केले आहे ?

2) संत नामदेवांच्या 'दीनांची माउली' या विठ्ठलभक्तीपर अभंगाचे रसग्रहण करा ?

३) संत नामदेवानी तुळशीचे महात्म्य कसे वर्णन केलेले आहे ?

४) 'केकावली' मधील उद्‌बोधनाचे स्वरुप स्पष्ट करा ?

५) मोरोपंतांच्या 'केकावली' चे रसग्रहण करा ?

६) 'भला जन्म हा तुला लाभला' या राम जोशी यांच्या कवितेचे रसग्रहण करा ?

७) ‘भला जन्म हा तुला लाभला’ या लावणीतून राम जोशी यांनी केलेल्या उपदेशाचे स्वरुप स्पष्ट करा ?

८) कवी यशवेत यांच्या फडकते तुझे तेथेच निशाण ! या कवितेचे रसग्रहण करा ?

९) कवी यशवंत यांनी फडकते तुझे तेथेच निशाण । या कवितेतून शेतकऱ्यांच्या दैन्याचे वर्णन कसे केले आहे ?

१०) ‘विराणी’ या कवितेचे रसग्रहण करा ?

‘विराणी’ या कवितेतून कवीमनातील उदासीनतेचे दर्शन कसे घडते ते स्पष्ट करा ?

**लघुत्तरी प्रश्न :**

१) रुंभणेचा दृष्टांता मधील विनोदाचे स्वरुप स्पष्ट करा ?

२) रुंभणेचा दृष्टांतातील सूत्र स्पष्ट करा ?

३) पारंपारिक स्त्रीधर्म म्हणजे काय ?

४) आता सगळाच मनू बदलून गेला आहे असे ताराबाई शिंदे का म्हणतात ?

५) आपल्या पहिल्या भाषणाचे वर्णन आचार्य अत्रे यांनी कसे केले आहे ?

६) शिवरामंत परांजपे यांच्या वक्तृत्वाची कोणती वैशिष्टये आचार्य अत्रे यांनी सांगितली आहेते ?

७) दादासाहेब खापर्डे यांच्या वक्तृत्वाची कोणती वैशिष्टये आचार्य अत्रे यांनी सांगितली आहेत ?

८) अच्युतरावांच्या वक्तृत्वाची कोणती वैशिष्ट्ये आचार्य अत्रे यांनी सांगितली आहे ?

९) पंडित महादेवशास्त्री जोशी यांनी भक्त पुंडलिकाचे महात्म्य कसे वर्णन केले आहे ?

१०) पंडित महादेवशास्त्री जोशी यांनी ‘चौऱ्यांशीचा लेख’ याविषयी कोणती माहिती दिली आहे ?

११) शिक्षकाने आजीवन विद्यार्थीच राहिले पाहिजे असे तुकडोजी महाराज का म्हणतात ?

१२) परीक्षेपुरती तयारी करुन देणे ही नाटकाची तालीम आहे, असे तुकडोजी महाराज का म्हणतात ?

१३) भीतीऐवजी प्रीतीचे वजनच यशस्वी होऊ शकते असे तुकडोजी महाराज का म्हणतात ?

१४) कशाच्या अवलंबनानेच भारतात फिरुन ‘रामराज्य’ निर्माण होईल, असा तुकडोजी महाराजांना पूर्ण विश्वास वाटतो ?

**पद्य विभाग :**

१५) नामदेवांनी विठ्ठलाला ‘दिनांची माउली’ असे का म्हटले आहे ?

१६) नामा म्हणे अवघे विठ्ठलाची ‘दीनांची जाले’ असे नामदेव का म्हणतात ?

१७) तुळस असे ज्याचे द्वारी । लक्ष्मी वसे त्याचे घरी असे नामदेव का म्हणतात ?

१८) मोरोपंतांनी मनाचे महत्व कसे वर्णन केले आहे ?

१९) परमेश्वराला मोरोपंत कोणती विनवणी करतात ?

२०) भला जन्म हा तुला लाभला असे राम जोशी का म्हणतात ?

२१) ‘परि भक्ति सांविण हरि भेटेल काय तुशी’ असे राम जोशी का म्हणतात ?

२२) भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा असे राम जोशी का म्हणतात ?

२३) कवी यशवंत यांनी शेतकरी स्त्रीचे वर्णन कसे केले आहे ?

२४) शेतकऱ्यांच्या मुलांविषयी कवी यशवंत यांनी काय म्हटले आहे ?

२५) ‘विराणी’ या कवितेतून कवी अनिल यांनी कोणकोणत्या प्रतिमा योजल्या आहेत ?

२६) अशा वेळी काळोख्यात विरुन जावे वाटते । असे कवी अनिल का म्हणतात ?

**व्यावहारिक मराठी :**

२७) इतिवृत्त लेखनाची पद्धती सांगा ?

२८) इतिवृत्त लिहिताना कोणती काळजी घ्यावयाची असते ?

२९) अहवालात्मक इतिवृत्ताचे स्वरुप स्पष्ट करा ?

३०) अहवालात्मक इतिवृत्ताचा नमुना तयार करा ?

३१) वृत्तसंस्था या राज्यसंस्थेच्या चौथा स्तंभ असतात असे कोणी व का म्हटले आहे ?

३२) बातमी म्हणजे काय ? बातमीची व्याख्या कशी करता येईल ? बातमी मिळविणे एक कला आहे असे का म्हटले जाते ?

३३) बातमीचे लेखन करताना वार्ताहराने कोणकोणती पथ्ये पाळावीत ?

३४) बातमीचे लेखन करताना पत्रकाराने कोणती काळजी घेतली पाहिजे ?

३५) आकाशवाणी आणि दूरचित्रवाणी या माध्यमात वृत्तलेखनाचे स्वरुप कसे वेगळे असते ते सांगा ?

३६) बातमीचे लेखन वाड:मयगुणसंपन्न कधी होऊ शकते ?

३७) भीषन खुनाची बातमी तयार करा ?

*******************

************

# बी. ए. द्वितीय वर्ष

# चतुर्थ सत्र

# दिर्घोत्तरी प्रश्न

**गद्य विभाग :**

१) वरुन रुक्ष वाटणाऱ्या पण आतून सरसतेच्या लाटा निर्माण करणाऱ्या माघाची माया, जड, गंभीर व अचेतन दिसणाऱ्या वृक्षांची स्तब्धता आणि त्याच्या उलट पाखरांची वाढती गती यांचा मेळ असा विरोधी तऱ्हेने घालीत असते या दुर्गा भगवतांच्या विधानाचा परामर्श घ्या ?

२) ''वरुण सुके निष्पर्णतेचे कवच धारण करणारा माघ अमोघ सृजनशीलतेने भरलेला आहे'' या विधानाची सत्यता पटवा.

३) रामभाऊ तपस्वी यांचे व्यक्तिमत्व रेखाटा ?

४) 'तपस्वी' या पाठाच्या आधारे रामभाऊ तपस्वी यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू उलगडून दाखवा ?

५) 'नवी पहाट उगवत आहे' असे निर्मलकुमार फडकुले का म्हणतात ?

६) 'नवी  पहाट उगवत आहे' या पाठातून व्यक्त झालेला निर्मलकुमार फडकुले यांचा आशावादी दृष्टीकोन स्पष्ट करा ?

७) 'लपलेला तारा' या विज्ञानकथेचे वाड:मयीन सौंदर्य उलघडून दाखवा ?

८) 'लपलेला तारा' या विज्ञानकथेची वाड:मयीन वैशिष्टये स्पष्ट करा ?

९) 'आंबेडकर नव्या भारताचे युग पाहत होते' असे बा.ह.कल्याणकर का म्हणतात ?

१०) ''आंबेडकर केवळ एक व्यक्ती नाही तर गुरा-ढोरांसारखं जीवनद जगणाऱ्या मानवसमूहाला संस्कृती देणारी शक्ती आहे'' असे बा.ह.कल्याणकर का म्हणतात ?

**पद्य विभाग :**

११) 'एक नव्या संघर्षात' या नारायण सुर्वे यांच्या कवितेचे रसग्रहण करा ?

१२) 'एक नव्या संघर्षात' या कवितेतील विद्रोहाचे स्वरुप स्पष्ट करा ?

१३) सुरेश भट यांच्या 'स्मरण' या कवितेचे रसग्रहण करा ?

१४) सुरेश भट यांच्या 'स्मरण' या कवितेचे वाड:मयीन सौदंर्य उलगडून दाखवा ?

१५) 'या नभाने' या ना.धों. महानोर यांच्या कवितेचे रसग्रहण करा ?

१६) 'या नभाने' या ना.धों. महानोर यांच्या कवितेतून भावसौंदर्य उलगडून दाखवा ?

१७) भाऊ पंचभाई यांच्या 'डोळे' या कवितेचे रसग्रहण करा ?

१८) भाऊ पंचभाई यांच्या 'डोळे' या कवितेतील करुण्याचे स्वरुप स्पष्ट करा ?

१९) 'न्यायासाठी' या कुसुम अलाम यांच्या कवितेचे रसग्रहण करा ?

२०) 'न्यायासाठी' या कवितेची सामाजिकता स्पष्ट करा ?

**लघुत्तरी प्रश्न :**

१) ''निसर्ग जितका अधळया तितकाच कंजूष आहे,'' असे दुर्गा भागवत का म्हणतात ?

२) झाडाचा विरळपणा माणसाच्या डोळीवरच्या खडलासारखा विद्रुप नसतो, त्यात एक निराळीच गंमत आहे, दुर्गा भागवत का म्हणतात ?

३) तारुण्य गेल्यामुळे उताराला लागलेल्या स्त्री-पुरुषांच्या मुखावर येतात तसेच करुण भाव वनस्पतींवर उमटलेले दिसल्याचा भास होतो, असे दुर्गा भागवत का म्हणतात ?

४) ''तपकिरी रंगाची मृत्युछाया झाडांवर बघावे तेथे स्थिर झाल्या सारखी वाटते आणि डोळयांना हा रंग सुखकर वाटत नसल्याने मन अजाणतेपणे वसंताची मार्गप्रतीक्षा करते,'' असे दुर्गा भागवत का म्हणतात ?

५) ''साऱ्या बाध्य अवतारात माघाच्या अंतरातला मायावीपणा दडलेला आहे,'' असे दुर्गा भागवत का म्हणतात ?

६) तपस्वीच्या प्रथम भेटीचे वर्णन लेखक पु.भा.भावे यांनी कसे केले आहे ?

७) तपस्वीच्या बाहयरुपाने वर्णन पु.भा.भावे यांनी कसे केले आहे ?

८) जणू कुणाला तरी देण्यासाठीच त्याने आपली जागा धरलेली असे असे तपस्वीविषयी पु.भा.भावे का म्हणतात ?

९) तर मग तुम्ही व्यसनी नाही तपस्वी आहात असे पु.भा.भावेंनी तपस्वींना का म्हटले ?

१०) लेखक पु.भा.भावे यांना तपस्वीच्या सीटवर काय सावडले ? व त्यावेळी त्यांना काय वाटले ?

११) 'तपस्वीच्या मृत्युनंतर हा एक मोठा माणसाचा जय होता' अस लेखक का म्हणतात ?

१२) संत माणसांना पुन्हा पुन्हा काय सांगतात ?

१३) संतानी, तत्वचिंतनकांनी, कवींनी व संशोधकांनी कोणते प्रश्न विचारले आहेत ?

१४) गांधीजी कशाला 'आतला आवाज' असे म्हणत होते ?

१५) एका विद्वान गृहस्थाने लेखकांना कोणता प्रश्न विचारला होता ?

१६) कावलूरच्या रस्त्याने जाताना राजेशचे विचार मात्र बंगलोरमध्येच का गुतंले होते ?

१७) 'पूर्वीची जिद्द आजच्या शास्त्रज्ञांमध्ये राहिली नाही' असे ब्रजेश का म्हणाला व त्यावर राजेशने काय उत्तर दिले ?

१८) राजेशला कुट प्रश्नांची उत्तरे मिळून उदास का वाटले ?

१९) महाराष्ट्र हे परिवर्तनाचं अख्ख्या भारतातलं विद्यापीठ आहे, असे बा.ह.कल्याणकर का म्हणतात ?

२०) बहिष्कृत आणि अतिशूद्रांना इतिहासाच्या रंगमंचावर आणण्याच प्रचंड काम आंबेडकरांनी केलं असे बा.ह. कल्याणकर का म्हणतात ?

२१) डॉ. आबेंडकर आपल्या समाजातलं तेज जागाविण्यासाठी काय सांगत असत ?

२२) महात्मा गांधी आणि आंबेडकर यांच्यात खटके का उडाले ?

२३) कवी नारायण सुर्वे यांनी 'एका नव्या संघर्षात' या कवितेतून विषमतेचे दर्शन कसे घडविले आहे ?

२४) आपल्या संस्कृतीविषयी कवी नारायण सुर्वे यांनी कोणते भाष्य केले आहे ?

२५) ज्यांना जन्मभर दु:ख, दैन्य, दारिद्रयच मिळाले असेल, त्यांनी तपाशिलासह सर्वच नाकारु नये तर काय करावे ?

२६) 'वेदनेला अंत नाही अन् कुणाला खंत नाही' असे सुरेश भट का म्हणतात ?

२७) 'आपल्या मुत्युनंतर काय व्हावे' अशी अपेक्षा कवी सुरेश भटांनी व्यक्त केली आहे ?

२८) कोणती पुण्ये अशी येती फळाला, जोधळयाला चांदणे लखडून जावे असे कवी का म्हणतात ?

२९) 'पाखरांशी खेळ मी मांडून गावे,' असे कवी का म्हणतात ?

३०) शब्दगंधेला कवी कोणती विनवणी करतात ?

३१) कवी भाऊ पंचभाई यांनी आपल्या 'डोळ' या कवितेतून कोणाकोणाच्या दु:खांचे वर्णन केलेले आहे ?

३२) 'डोळे' या कवितेत आलेल्या प्रतिमा सांगा ?

३३) 'न्यायासाठी' या कवितेतून कवीला काय सिद्ध करायचे आहे ?

३४) सत्य आणि अहिंसा याविषयी कवीने काय म्हटले आहे ?

३५) न्यायसंस्थेविषयी कवीने काय म्हटले आहे ?

३६) भाषातंराचे महत्व विशद करा ?

३७) भाषांतराचे विविध प्रकार सांगा ?

३८) लक्ष्यनिष्ठ भाषांतराचे स्वरुप स्पष्ट करा ?

३९) भावानुवाद, मुक्त अनुवाद आणि रुपांतर या भाषांतराच्या वेगवेगळया रुपांचे स्वरुप स्पष्ट करा ?

४०) भाषातंराची पूर्वतयारी कसी करावी ?

४१) भाषांतरकारास कोणते ज्ञान आवश्यक आहे ?

४२) ''व्यक्तिमत्वाचे दर्शन घडविणे हा मुलाखतीचा मुख्य हेतू असतो'' स्पष्ट करा ?

४३) मुलाखत या प्रकाराचा उद्देश कोणता आणि आजच्या काळात या प्रकारचे महत्व कोणते ते सांगा ?

४४) सर्वेक्षणासाठी घेतल्या जाणाऱ्या अनेक व्यक्तींच्या मुलाखतींचे स्वरुप कसे असते ?

४५) कोणकोणत्या निमित्ताने मुलाखती घेतल्या जातात ?

४६) मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीला मुलाखत घेण्यापुर्वी कोणती तयारी करावी लागते ?

४७) मुलाखत वाचनीय व उपयुक्त होण्यासाठी मुलाखतीच्या लेखनाचे कोणते तंत्र आहे ?

******************

************

# बी. ए. तृतीय वर्ष

# पाचवे सत्र

# दिर्घोत्तरी प्रश्न

१) ‘विव्हावो स्वीकारू’ या श्री गोविंद प्रभूंच्या लीळेतील आशय स्पष्ट करा.

२) ‘सुधारक’ काढण्याचा कोणता हेतु आगरकरांनी सांगितलेला अहो.

३) ‘‘युगाला आकार देणारे आम्ही काळपुरुष आहोत’’ असे विनोबा भावे का म्हणतात ? हे सांगुन पाठात अंतभूर्त असलेल्या ‘श्रीवस्तीच्या’ कथेचे स्वरुप आणि तिचे मर्म सविस्तर विशद करा.

४) महाभारतातील खांडव वन जाळण्याची कथा लेखीका इरावती कर्वे यांनी ‘मयसभा’ या पाठात कशा प्रकारे वर्णन केली आहे हे सविस्तर लिहा द्य

५) कृष्णार्जुनाने खांडवप्रस्थात किंवा इंद्रपस्थात गेलयावर प्रणीसंहार का व कसा केला ? हे मयसभा’ पाठाच्या आधारे सविस्तर वर्णन करा.

६) ‘‘महाभारतातील पांडवांची ‘मयसभा’ ही वास्तू नुसती अपशकुनीच नव्हे तर आभासमय सुद्धा होती’’ हे विधान ‘मयसभा’ पाठाच्या आधारे सविस्तर वर्णन करा ?,

७) खांडवन जाळतांना कृष्णार्जुनाला कोणी व कसा विरोध केला आणि तो कितपत सफल झाला हे लेखक इरावती कर्वे लिखीत ‘मयसभा’ पाठाच्या आधारे थोडक्यात सपष्ट करा.

८) कृष्णाअर्जुनाने खांडव वनात केलेला प्राणी संहार आणि तक्षक घराणे याबाबत महाभरतात आलेल्या एका उपकथेचा परामर्श लेखक इरावती कर्वे यांनी ‘मयसभा’ पाठात कसा घेतला योच थोडक्यात कथन करा ?

९) ‘एखाद्या चित्रपटातील एखादा ‘मॉबसिन’ चा शॉट डोळ्यासमोरून सरकावा त्याप्रमाणे खुटमुट्या चाळीचे दर्शन गाडगीळ यांनी घडविले आहे’ या विधानाची सत्यता सपष्ट करा.

१०) ‘किडलेली माणसे’ या प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या कथेचा आशय स्पष्ट करा.

११) ‘जे का रंजले गांजले’ या अभंगाचा आश्य स्पष्ट करा.

१२) तीर्थाला जाणाऱ्यांना तुकाराम कोणते खडे बोल सुनावतात ?

१३) संत जगाच्या गुणदोषांनी लिप्त होत नाहीत हे सांगातांना तुकारामांनी कोणकोणते दृष्टांत दिले आहे.

१४) ‘आलीया भोगासी असाव सादर’ या अभंगाचा भावार्थ उलगडून दाखवा.

१५) संत तुकारामांनी परमेश्वराला माझा सांभळ कर असे का म्हटले आहे ?

१६) ‘पंढरीवर्णन’ या कवितेचा भावार्थ उलगडुन दाखवा.

१७) शाहीर प्रभाकर यांनी विठ्ठल, पंढरपूर यांचे वर्णन कसे कले आहे ते स्पष्ट करा.

१८) चाफा कवितेचे रसग्रहण करा.

२०) कवी ना. ध. देशपांडे यांच्या ‘समाधान’ या कवितेतील नायकाचे जीवन कष्टप्रद असले तरी ते कशामुळे त्याला सुसह्य होते ? ते सविस्तर लिहा.

२१) कवी ना. ध. देशपांडे यांच्या ‘समाधान’ या कवितेतुन आपणास कोणता संदेश मिळातो ?

२२) या कवितेतुन आपणास काय शिकावयास मिळते ? किंवा कवी ना. ध. देशपांडे यांची समाधान ही कविता जीवनातील कोणते सत्य सांगते ? चर्चा करा.

**लघुत्तरी प्रश्न :**

१) विवाहाची तयारी का व कशी करण्यात आली ?

२) इतर राष्ट्रांच्या तुलनेत आमच्या वाट्यास एक उत्तम देश आला आहे असे का म्हटले आहे ?

३) कोणत्या कारणांमुळे आगरकरांना आपला देश मोठा वाटतो.

४) ऐतिहासिकदृष्ट्या आमच्या देशाची लांबी सर्वांत अधिक भरण्याची शक्यता, आहे असे का म्हटले आहे.

५) भाषपारिज्ञानाने आलिकडे कोणता सिद्धांत प्रतिपादन केलेला आहे.

६) सुधारक काढण्याचा हेतु कोणता होता ?

७) येथील (भारतातील) धर्मविषयक व समाजविषयक कल्पना कशा स्वरूपाच्या आहेत ?

८) सुधारकाच्या जन्माची सार्थकता कशात आहे.

९) आपल्या कुटूंबावर केलेल्या प्रेमातुन जेवढा आनंद आपणास मिळतो तयाच्या कितीतरी पट आनंद समाजावर केलेल्या प्रेमाच्या प्रवाहातून मिळतो. याचे थोडक्यात वर्णन विनोबा भावे यांनी लिहिलेल्या ‘आम्ही युग बनविणारे आहोत’ या पाठातून व्यक्त करा?

१०) ‘‘आनंदाची प्राप्ती हे मनुष्याचे कर्तव्य नसून त्या आनंदाची शुद्धी करणे हे आहे’’ या विधानाची सत्यता विनोबा भाव यांनी ‘आम्ही युग बनविणारे आहोत’ या पाठातून कशी साध्य केली आहे याचे थोडक्यात वर्णन करा ?

११) परमेश्वर आणि सृष्टी यांनी आम्हाला कोणती शिकवण दिली याचे थोडक्यात वर्णन प्रस्तुत पाठाच्या आधारे लिहा.

१२) कृणार्जुनाचे खांडव वनात केलेला प्राणी संहार आणि तक्षक घराणे याबाबत महाभारतात आलेल्या एका उपकथेचा रामर्श लेखक इरावती कर्वे यांनी ‘मयसभा’ पाठात कसा घेतला याचे थोडक्यात कथन करा ?

१३) चाळीतल्या वरच्या मजल्यावरील व्यक्तींचे व्यक्तिदर्शन लेखकाने कसे घडविले आहे ?

१४) मानवी नमुन्याचे विविध दर्शन ‘किडलेली माणसे’ या कथेत कसे व्यक्त झाले आहे ?

१५) श्यामरावनी मुसलामाबद्दल ह्या व्यक्त केलेली ऐनापुरे यांन का आवडले नाही ?

१६) ‘चाळीतल्या किडलेल्या माणसांची मने मरून गेली होती’ सोदाहरण स्पष्ट करा.

**पद्य :**

१७) ‘आलीया भोगासी असावे सादर’ या अभंगाचा भावार्थ उलगडुन दाखवा.

१८) संत तुकारामांनी परमेश्वराला माझा सांभाळ कर असे का म्हटले आहे ?

१९) भिमातटाचे वर्णन शाहीर प्रभाकर यांनी कसे केले आहे ?

२०) ‘चाफा’ या कवितेचा भावार्थ उलगडून दाखवा ?

२१) कवी भा. रा. तांबे यांनी आपल्या ''कळा ज्या लागल्या जीवा या कवितेत जोवाची'', मनाची हतबलता कोणत्या उपमा देऊन (कोणत्या उदाहरणाद्वारे) दाखवुन दिली आहे ?

२२) 'कला ज्या लागल्या जीवा' या कवितेत कवी तांबे यांनी जनरीतीचे कसे वर्णन केले आहे.

२३) जीवाला लागलेली ध्योयाची आस पूर्ण करतांना ''फळा ज्या लागल्या जीवा'' या कवितेतील नायिकेस कोणता त्रास होतो ?

२४) समाधान या कवितेतील नायक कोणती कामे करतो ?

२५) कवी ना. ध. देशपांडे यांच्या 'समाधन' या कवितेतील थकलेला नायक आपल्या पत्नीजवळ कशाची मागण करतो ? व तिला कोणता दिलासा देतो ?

२६) कवी ना. ध. देशपांडे यांच्या 'समाधान' या कवितेतील नायक कोणत्या बिकट परिस्थितील असतो ? व तरीही तो समाधानी कसा?

१) संपादनाच्या प्रेरणा व स्वरूप स्पष्ट करा.

२) गौरवग्रंथाचे संपादन यावर टीप लिहा.

३) स्मरणिकेत कोणत्या बाबींचा समावेश केल जातो.

४) वाड:मय इतिहासाचे संपदान यावर टीप लिहा.

५) संहिता संपादन म्हणजे काय ?

६) संहितेची सिद्धता कशी केली जाते? किंवाा संहितेची सिद्धता होण्यासाठी संपादकास कोणकोणती कामे करावी लागते ?

७) संपादन कामाची व्याप्ती स्पष्ट करा किंवा आशय संपादन सविस्तर स्पष्ट करून लिहा किंवा संपादकाने संहितेवर करावयाच्या आशयसंपादनसंस्काराचे स्वरूप स्पष्ट करा.

८) संपादकाने संहितेवर करावयाच्या तांत्रिक संस्कारांची सविस्तर माहिती लिहा किंवा संपादकाने संहितेवर करावयाचा तांत्रिक संस्कार विस्ताराने लिहा.

९) टिपणीचे प्रकार थोडक्यात लिहा.

१०) टिपणी लिहिणयाची पद्धती व टिपणी लिहितांना घ्यावयाची काळजी स्पष्ट करा.

११) जाहीर निवेदन म्हणजे काय ?

१२) माहितीपत्रकाचे स्वरूप कसे असते ?

१३) माहितीपत्रकातील माहितीचा हेतु कोणता असतो ?

१४) कंपनीच्या उत्पादनासंबंधीच्या माहितीपत्रकाचे स्वरूप कसे असते.

१५) आवाहन कसे केलेले असते ?

१६) आवाहनाचे स्वरूप कसे असते ?

१७) आवाहनाचा उद्देश काय असतो ?

*******************

************

# बी. ए. तृतीय वर्ष

# सहावे सत्र

# दिर्घोत्तरी प्रश्न

**गद्य विभाग :**

१) द्रौपदी, भीम आणि अश्वत्थामा यांच्यातील संघर्षमय चर्चेचे वर्णन करा ?

२) 'चक्र' या एकांकिकेतून विद्याधर पुडंलिक यांनी द्रौपदीचे वर्णन कशाप्रकारे केले आहे ?

३) द्रौपदीच्या मनातील गूढ भावना 'चक्र' या एकांकिकेतून कशा स्पष्ट झालेल्या आहेत ?

४) लेखक मारोती चितमपल्ली यांनी पक्षीयान पाठाच्या आधारे निसर्गाचे सौंदर्य वर्णन कसे केले आहे ?

५) निसर्गातील पक्ष्यांच्या अलौकिक सौंदर्याचे वर्णन लेखकाने कोणत्या सुंदर शब्दात केले आहे ?

६) पक्ष्यांच्या सौंदर्यामुळे मनुष्याच्या जीवनाला एक नवा मार्ग मिळाला आहे. जीवनात आनंद कसा प्राप्त झाला आहे ते स्पष्ट करा ?

७) 'पक्षिगान' या पाठातून कोणता विचार अभिव्यक्त झाला आहे ?

८) 'अन्वरक्षा फकीर' या पाठातून अन्वरशा फकिराचे व्यक्तिचित्र स्पष्ट करा ?

९) 'अन्वरक्षा फकीर' या पाठातून अन्वरशाच्या कनवाळू वृत्तीचे दर्शन कशाप्रकारे घडले आहे ?

१०) 'अन्वरशा फकीर' या पाठातून लेखक मधुकर वाकोडे यांनी लेखन विषयक कोणते संस्कार दिलेले आहे?

११) 'विवेकवाद' म्हणजे काय ? दाभोळकरांनी त्याचे महत्व कसे विशद केले आहे ते स्पष्ट करा ?

१२) डॉ. नरेंद्र दाभोळकरांनी 'धर्मनिरपेषता' हा विचार कसा स्पष्ट केला आहे ?

१३) 'मेटाखेडा' या गावाचे नाव वेश-विदेशापर्यंत कशाप्रकारे पोहचले हे स्पष्ट करा ?

१४) विदेशात या मेटीखेडा गावाची कीर्ती कशी गेली ?

१५) 'आपुलाची वाद आपणांसी' या पाठातून लेखकांचे स्वप्न कसे पूर्ण झाले ते स्पष्ट करा ?

१६) 'आपुलाची वाद आपणांसी' या पाठातील संघर्षाचे वर्णन करा ?

**पद्य विभाग :**

१७) 'ही निळी पांढारी' या कवितेच्या आधारे इंदिरा संतांनी दुपारचे वर्णन कसे केले आहे ?

१८) 'ही निळी पांढरी' या कवयित्री इंदिरा संत यांच्या कवितेचे रसग्रहण करा ?

१९) 'दोन ज्योती' या कवितेतील सौंदर्य स्पष्ट करा ?

२०) 'पाऊस' या कवितेतून स्त्रीच्या मनाची भावनिक अवस्था कशी व्यक्त केली आहे ते स्पष्ट करा ?

२१) कवी नामदेव ढसाळ यांनी आपल्या 'प्रेम' कवितेतून कोणता विचार व्यक्त केला आहे ?

२२) कवी नामदेव ढसाळ यांनी तत्कालीन समाजात होणारी क्रांती किंवा बदल कसा स्पष्ट केला आहे ?

२३) दलितांच्या वेदनेचा स्फोट होऊन बदल होणार आहे हे विधान स्पष्ट करा ?

२४)	‘प्रेम’ या कवितेत नामदेव ढसाळ यांनी मांडलेल्या क्रांतीचा विचार स्पष्ट करा ?

२५)	‘टाहरा’ या कवितेत कवी दशरथ मडावी यांनी कोणता संदेश दिला आहे ?

२६)	आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी काय करावे ?

२७)	आदिवासी समाजाला पुढाऱ्याची गरज का आहे ?

२८)	आदिवासींचा मागासलेपणा कसा दूर होऊ शकतो ?

२९)	आदिवासींची सद्यस्थिती बदलण्यास काय आवश्यक आहे ?

३०)	आदिवासींची मार्गदर्शक कसा असावा व त्यांना मार्गदर्शनाची आवश्यकता आहे ?

**लघुत्तरी प्रश्न :**

१)	भीमाला हुरहुर का वाटत होती ?

२)	स्वत:च्या दु:खाबद्दल अश्वत्थामा काय म्हणतो ?

३)	भयंकर अस्त्र तू गर्भवती स्त्रियांच्या गर्भावरही सोडलंस, तू तिथंच कसा थांबला नाहीस ? त्यावर अश्वत्थामा काय उत्तर देतो ?

४)	इंद्रधनुष्याने आकाश त्याचप्रमाणे पक्ष्यांमुळे वनश्री शोभते हे लेखकाचे म्हणणे का योग्य वाटते ?

५)	पक्षी आणि स्त्रियांचे सौंदर्य दर्शन कसे होते ते स्पष्ट करा ?

६)	पक्ष्यांच्या घरट्यातून सौदंर्याचे दर्शन कसे होते ते स्पष्ट कारा ?

७)	गावातील मुलांना अन्वरशा कशी वागणूक द्यायचा हे स्प्ष्ट करा तसेच अन्वरशा व दतू टप्पेवाला यांची माहिती स्पष्ट करा ?

८)	अन्वरशाचा प्रामाणिकपणा ‘अन्वरशा फकीर’ या पाठातून कसा दिसून येतो ?

९)	अन्वरशा हा चिंचेवरील मोहोळ का झाडत नव्हता ?

१०)	नरेंद्र दाभोळकरांनी ‘अंधश्रद्धस निर्मूलप चळवळ’ यशस्वी करण्यासाठी कोणते मार्ग सांगितले आहेत ?

११)	दाभोळकरांनी अंधश्रद्धा निर्मूलनाचे महत्व कसे विशद केले आहे ?

१२)	वैज्ञानिक दृष्टीकोनाचे महत्व डॉ. दाभोळकरांनी कसे स्पष्ट केले आहे ?

१३)	भारतात कशाप्रकारची लोकशाही होती असे लेखक चंद्रकांत वानखेडे म्हणतात ?

१४)	निवडणूक जिंकल्यानंतर गावात कोणकोणत्या घटना घडल्या होत्या ?

**पद्य विभाग :**

१५)	‘ही निळी पांढरी’ या कवितेच्या आधारे तळ्याचे वर्णन करा ?

१६)	कवयित्री इंदिर य कवितेच्य आधार तळ्याचे वर्णन करा. भावकवितेचे वैशिष्ट्य थोडक्यात स्पष्ट करा.

१७)	‘‘दु:ख सर्वांचेच आहे. तुमचे आहे, माझे आहे’’ असे कवी रशरदचंद्र मुक्तीबोध का म्हणतात.

१८)	कवीने काळ्या ज्योतीचे वर्णन कशा प्रकारे केलेले आपणांस आढळु ये ?

१९)	दोन ज्योती या कवितेत कवी शरदचंद्र ुक्तिबोधांनी लाल ज्योतीचे वर्णन कसे  केले आहे ?

२०)	‘पाऊस’ या कवी ग्रेसांच्या कवितेतुन  कोणते दु:ख प्रकट झाले आहे.

२१) कवी ग्रेस यांची साहित्यसंपदा स्पष्ट करा.

२२) 'प्रेमच सोडूनजात अशी आपली जागा' असेकवी नामदेव ढसाळ का म्हणतात.

२३) कवी नामदेव ढसाळ दलितांनाकोणता सल्ला देतात ?

२४) 'टाहरा' या कवितेतुन कवी दशरथ मडावी यांनी सुतार पक्षाचे उदाहरण कशाप्रकारे दिले आहे ?

२५) 'टाहरा' या कवितेतुन आदिवासी चित्रण कसे चित्रित झाले आहे ?

२६) २१ व्याशतकाच्या अनुषंगाने ग्रंथपरीक्षणाचे महत्व सांगा.

२७) ग्रंथवाचन करतांना महत्वाचे असणारे घटक सविस्तर लिहा.

२८) संगणक संवाद म्हणजे काय ?

२९) मराठी संकेतस्थळाबद्दल माहिती लिहा.

३०) मराठी संके स्थळ म्हणजे काय ?

३१) इंस्टंट मेसेजिंगचे फायदे व तोटे लिहा.

३२) इंटरनेटवरील लेख, कविता आणि इतर ललित साहित्य या संबंधी माहिती लिहा.

*******************

************